ग्रंथमालिका ‘आचारधर्म’ : सात्त्विक अलंकार – खंड ३

# स्त्रियांनी अलंकार घालण्यामागील शास्त्र

मराठी (Marathi)


**संकलक**

**हिंदु राष्ट्राच्या स्थापनेचा उद्घोष करणारे**

**सच्चिदानंद परब्रह्म डॉ. जयंत बाळाजी आठवले**

**सूक्ष्म–ज्ञानप्राप्तकर्ते**

**श्रीचित्‌शक्ति (सौ.) अंजली मुकुल गाडगीळ**

**सौ. रंजना गौतम गडेकर**



**सनातन संस्था**

प्रस्तुत पुनर्मुद्रणाच्या २,५०० प्रती आणि

या लघुग्रंथाच्या आतापर्यंत १,१४,५२० प्रती प्रकाशित !

## अनुक्रमणिका


卐 **ग्रंथाच्या संकलकांचा परिचय** ५

卐 **ग्रंथात दिलेल्या सूक्ष्मातील प्रयोगांची वैशिष्ट्ये** ९

卐 **मनोगत** १०

१. स्त्रियांनी अलंकार घालण्याचे महत्त्व आणि लाभ १२

२. भावनाप्रधानता जास्त असलेल्या स्त्रियांनी कोणत्या प्रकारचे अलंकार परिधान करावेत ? २२

३. विधवांनी अलंकार परिधान का करू नयेत ? २४

४. अलंकार घालणारी आणि न घालणारी स्त्री २६

५. सर्वसामान्य स्त्री आणि वाईट शक्तींचा त्रास असणारी स्त्री यांच्यावर अलंकारांचा होणारा परिणाम २८

६. अलंकार परिधान करण्यासंदर्भातील सूक्ष्मातील प्रयोग ४२

७. अलंकार घालण्याविषयी व्यावहारिक सूचना ६५

८. अलंकारांची अनावश्यकता कोणाला ? ६६

卐 **प्रस्तुत ग्रंथाचे असामान्यत्व लक्षात घ्या !** ६७

卐 **संकलकांचा वैज्ञानिक दृष्टीकोन** ६९

# सच्चिदानंद परब्रह्म डॉ. जयंत आठवले यांच्या अद्वितीय कार्याचा संक्षिप्त परिचय

१. अध्यात्माच्या प्रसारासाठी ‘सनातन संस्थे’ची स्थापना

२. हिंदु राष्ट्राच्या (ईश्वरी राज्याच्या) स्थापनेचा उद्‌घोष (वर्ष १९९८)

३. शीघ्र ईश्वरप्राप्तीसाठी ‘गुरुकृपायोग’ या साधनामार्गाची निर्मिती : यानुसार साधना करून २०.३.२०२४ पर्यंत १२७ साधक संत झाले, तर १,०५३ साधकांची संतत्वाच्या दिशेने वाटचाल चालू !

४. ग्रंथ-निर्मिती : मार्च २०२४ पर्यंत ३६५ ग्रंथांच्या १३ भाषांत ९६ लाख ३१ सहस्र प्रती आणि ५,००० हून अधिक ग्रंथ होतील एवढे लिखाण प्रकाशित होण्याच्या प्रतीक्षेत !

५. शारीरिक, मानसिक, तसेच वाईट शक्तींच्या त्रासांवरील उपायपद्धतींविषयी संशोधन

६. स्वतःचा देह (नखे, केस आणि त्वचा), तसेच वापरातील वस्तू यांच्यातील दैवी पालटांविषयी संशोधनकार्य अन् स्वतःच्या महामृत्यूयोगाचा संशोधनात्मक अभ्यास

७. आचारपालनातील कृती, धार्मिक कृती आणि बुद्धीअगम्य घटना यांचे वैज्ञानिक उपकरणांद्वारे संशोधन

८. कलेचे सात्त्विक सादरीकरण होण्यासाठी संशोधन

९. २०.३.२०२४ पर्यंत २ बालक-संतांची, तसेच ६० टक्क्यांहून अधिक आध्यात्मिक पातळी असलेल्या २२७ अन् अन्य ९१८ दैवी बालकांची ओळख समाजाला करून दिली आहे. दैवी बालकांविषयी संशोधनही चालू आहे.

१०. ‘सनातन प्रभात’च्या माध्यमातून पत्रकारितेचे कार्य

११. भीषण आपत्काळाचा विचार द्रष्टेपणाने अनेक वर्षे आधीच करून आपत्काळात जीवितरक्षणासाठी आवश्यक असणाऱ्या विविध उपाययोजनांविषयी ग्रंथ, नियतकालिके, संकेतस्थळे आदी माध्यमांद्वारे मार्गदर्शन

**(संपूर्ण परिचयासाठी वाचा - ‘www.Sanatan.org’.)**

# सनातनच्या सूक्ष्म-ज्ञानप्राप्तकर्त्या साधकांचे अद्वितीयत्व !



श्रीचित्‌शक्ति (सौ.) अंजली गाडगीळ



सौ. रंजना गौतम गडेकर

सूक्ष्म-ज्ञानप्राप्तकर्ते साधक पृथ्वीवर कुठेही उपलब्ध नसलेले अध्यात्मातील विविध विषयांवरील सखोल अध्यात्मशास्त्रीय ज्ञान सूक्ष्मातून मिळवतात. वर्ष २००३ पासून त्यांना मिळणारे हे ज्ञान सनातनच्या साधारणपणे ६० हून अधिक ग्रंथांत घेतले आहे. ईश्वराकडून मिळणारे हे ज्ञान ग्रहण करण्यासाठी त्या साधकांना वाईट शक्तींच्या आक्रमणांनाही तोंड द्यावे लागते. असे असले, तरी गुरुकृपेच्या बळावर ते ही सेवा करतच आहेत.

सच्चिदानंद परब्रह्म डॉ. जयंत आठवले यांच्या एक आध्यात्मिक उत्तराधिकारी श्रीचित्‌शक्ति (सौ.) अंजली गाडगीळ यांना पूर्वी सूक्ष्म-जगतातील एक विद्वान किंवा गुरुतत्त्व यांच्या माध्यमातून ज्ञान मिळायचे.

## मनोगत

‘हिरेजडित मुकुट शोभतो बरा । रुणझुणती नुपूरे चरणी घागरिया ॥....’ देवताही जेथे अलंकारांनी विभूषित असतात, तेथे मनुष्यजिवांचे काय ? स्त्रीजातीसाठी तर अलंकार म्हणजे, स्त्रीचे लावण्य आणि शालीनत्व जपणारा सहस्रो वर्षांपासूनचा अनमोल सांस्कृतिक वारसा. स्त्रीसाठी अलंकार ही केवळ शोभेची वस्तू नसून स्त्रीला ईश्वरी चैतन्य प्रदान करणारा आणि तिच्यातील देवत्व जागृत करणारा तो एक महत्त्वाचा घटक आहे, हे या लघुग्रंथात शास्त्रासह सांगितले आहे.

सध्याच्या कलियुगात जवळजवळ प्रत्येकालाच अल्प-अधिक प्रमाणात वाईट शक्तींचा त्रास असतो. अतृप्त पूर्वज, वाईट शक्ती इत्यादींच्या त्रासांपासून रक्षण करण्यात अलंकार मोलाची भूमिका कशी पार पाडतात, हेही या लघुग्रंथात दिले आहे. तसेच अलंकार नुसतेच परिधान करण्यापेक्षा वेळोवेळी त्यांना विभूती लावून परिधान करणे किती श्रेयस्कर आहे, हे एका साधिकेने त्या संदर्भात केलेल्या सूक्ष्म ज्ञानाविषयीच्या

प्रयोगांवरून लक्षात येते. यावरून अलंकारांच्या शुद्धीचे महत्त्वही कळते. स्त्रियांचे विविध अलंकार, त्यांचे महत्त्व आणि ते परिधान करून केलेले सूक्ष्म ज्ञानाविषयीचे प्रयोग यांविषयीचे विवेचन अलंकारविषयक मालिकेतील निरनिराळ्या ग्रंथांत केले आहे.

या लघुग्रंथामुळे अलंकारांचे महत्त्व कळून अशी चैतन्यमय देण देणाऱ्या हिंदु धर्माचे महत्त्व लक्षात यावे, ही श्री गुरुचरणी प्रार्थना. – **संकलक**

## सच्चिदानंद परब्रह्म डॉ. आठवले यांच्या उत्तराधिकाऱ्यांच्या उपाध्यांविषयीचे विवेचन !

जीवनाडीपट्टी–वाचनाद्वारे सप्तर्षींनी केलेल्या आज्ञेनुसार १३.५.२०२० पासून सद्गुरु (सौ.) बिंदा सिंगबाळ यांना ‘श्रीसत्‌शक्ति’ आणि सद्गुरु (सौ.) अंजली गाडगीळ यांना ‘श्रीचित्‌शक्ति’ या उपाध्यांनी संबोधले जात आहे.